जा.क्र.मंत्री (रोहयो/पर्यटन)/नोट/४१७/२०१७
११/०७

मंत्री
रोजगार हमी, पर्यटन
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : ११/०७/२०१७

# शुभसंदेश

**अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान**च्यावतीने दोंडाईचा (जि. धुळे) येथील **स्वोद्धारक शिक्षण संस्थे**तील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल या संस्थेचा एक प्रतिनिधी म्हणून मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

गोर-गरीब आणि सामान्य विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी स्वोद्धारक शिक्षण संस्था नेहमी प्रयत्नरत आहे. **अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान**सारख्या स्वयंसेवी संस्थाही शिक्षण प्रसाराच्या या कार्यात नेहमी योगदान देतात. शैक्षणिक साहित्याअभावी अनेक गोर-गरीब विद्यार्थी आणि विशेषत: मुलींची मोठी गैरसोय होते. ही गैरसोय लक्षात घेऊन अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानने शैक्षणिक साहित्य वाटपाचा स्त्युत्य उपक्रम राबविला.

प्रतिष्ठानने यापुढील काळातही समाजातील गोर-गरीब आणि वंचित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचे कार्य निरंतर सुरु ठेवावे. प्रतिष्ठानच्या पुढील वाटचालीस मी मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो.

(जयकुमार रावल)